# Indian Streams Research Journal

**International Recognized Multidisciplinary Research Journal**

ISSN : 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume -6 | Issue - 2 | March - 2016


## भ्रष्टाचार मुक्त भारतीय समाजासाठी शिक्षण





**प्राध्या. श्री. ननवरे किरण वि.**

**सहायक प्राध्यापक, अभिनव शिक्षणशास्त्र महाविद्यालय, आंबेगाव बु. पुणे.**



**सारांश**

भारतात स्थानिक पातळीपासून ते राष्ट्ीय पातळीपर्यंत प्रत्येक ठिकाणी मुलभूत व इतर बाबींमध्ये प्रचंड मोठया प्रमाणात आर्थिक, नैतिक व सामाजिक भ्रष्टाचार अनुभवास येतो. याची उदाहरणे बोफोर्स, चारा, मुद्रांक, कॉमनवेल्थ, कोळसा, टू-जी स्पेक्ट्रम ते शालेय पोषण आहार, गणवेश, इ...! ही यादी संपणार नाही इतकी आहे. भ्रष्टाचार ही एक मानसिक प्रवृत्ती आहे. तर लोभ हा त्याचा पाया आहे. नैसर्गिक सहजप्रवृत्तीं अंतर्गत मॅकडुगल या मानसशास्त्रज्ञाने दिलेल्या 14 सहजप्रवृत्तीमध्ये या प्रवृत्तीचा समावेश होतो. तिचे शमन करण्यासाठी विविध मार्गांचा वापर केला जातो. औपचारिक शिक्षणात शालेय वयातच भ्रष्टाचार विरोधी जाणिवांचा विकास करण्यासाठी पालक , कुटुंब, समाज, अनौपचारिक आणि औपचारिक शिक्षण अशा सर्वच पातळयांवरून प्रयत्न होणे गरजेचे आहे. यामध्ये शिक्षकांची भूमिका महत्त्वाची ठरते. ''कोणतही मूल हे पाठयपुस्तकातून नव्हे तर, शिक्षकाच्या चालण्या,बोलण्या,वागण्यातून शिकत असतं.'' त्यासाठी शिक्षकांनी अध्ययन-अध्यापनाबरोबरच , अभ्यापूरक व अभ्यासेतर उपक्रमांच्या माध्यमातून

विद्यार्थ्यांमध्ये कळत-नकळत भ्रष्टाचार विरोधी जाणिवांचा विकास करणे गरजेचे आहे. यापुढे जाउन भ्रष्टाचार म्हणजे काय? , तो कसा होतो, त्याचे परिणाम कोणते याची जाणिव करून द्यावी.

**मुख्य संकल्पना :** सामान्य जीवन, भारतीय समाज, प्रशासन , भ्रष्टाचार , कारणे , उपाय , सूत्रबध्द कार्यनीती, समाज, कुटंब ,व्यक्ती ,शासन-प्रशासन व शिक्षण आणि शिक्षक जबबाबदा-या – भूमिका.

सद्यःस्थितीत भारतीय सामाजिक - आर्थिक स्थितीचे वास्तव परीक्षण केले तर देश स्वतंत्र होउन 65 वर्शे लोटली तरी आमच्या मूलभुत गरजांची पूर्तता तरी होउ शकली की नाही? तर या प्रश्नाचे उत्तर नाही असेच मिळेल. भविष्यकाल काय असेल या परिस्थितीचा अंदाज घ्यावयाचा म्हटले तर जागतिकीकरण व तंत्रज्ञानामुळे ते अशक्यप्राय होउन बसले आहे. भारतीय सामाजिक परिस्थितीचा वास्तव व चिकित्सक विचार करताना भरमसाठ लोकसंख्या , अकुशल मनुष्यबळ व त्या अनुषंगाने त्याचे परिणाम म्हणजे बेकारी, दारिद्रय , मूलभुत गरजांची कमतरता, त्यामुळे भ्रष्टाचार , गुन्हेगारी , संप, मोर्चे, दंगे, जाळपोळ, आराजकता, गलिच्छ राजकारण यांनी आज सर्वात उग्र रूप धारण केलेला प्रश्न म्हणजे भ्रष्टाचार.

आपला भारत देश बाहय शत्रुंपेक्षा देशांतर्गत भ्रष्ट व्यक्तींमुळेच जास्त पोखरला गेलेला आपणास दिसून येतो. वैयक्तिक स्वार्थ पराकोटीला जाउन सामाजिक-नैतिक मूल्यांची प्रचंड घसरण झालेली पावलोपावली अनुभवास येत आहे. याला कोणतेही क्षेत्र वर्ज्य राहिलेले नाही. आजही देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी 25 टक्के जनता दारिद्रयात खितपत आहे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक, नैतिक, अध्यात्मिक , कौटुंबिक व वैयक्तिक मूल्यांचा प्रचंड वेगाने -हास होत असून संयम, सहिष्णुता, कर्तव्यनिष्ठा, सभ्यता, सचोटी, संकोच, सौजन्य , सामाजिक बांधिलकी, उत्तरदायित्व, निर्मोहीत्व या बाबी लोप पावत आहेत. यातूनच महागाई, गुन्हेगारी, सत्तेचा स्वार्थी वापर ,भेसळ, लाच-लुचपत, भ्रष्टाचार वाढत आहे. त्यातच कायदयाबद्दलची भिती कमी होउन समाजात सर्वसामान्यांचे जीवन जगणे मुश्किल झाले आहे. वर्तमानपत्रातून , टी.व्ही. चॅनल्सवरून रोज कित्येक कोटी - अब्जावधी रूपयांचा भ्रष्टाचार झाल्याच्या बातम्या आपण वाचत, पहात असतो. व दुस-या दिवशी विसरून जातो. या सर्व बाबींचा आढावा घेतल्यानंतर श्रमातून निर्माण होणा-या पैशापेक्षा भ्रष्टाचारातून मिळणा-या पैशाचे प्रमाण सरस ठरत असलेले दिसते. भ्रष्टाचार म्हणजे तरी नेमके काय याचा व्यापक विचार करणे गरजेचे आहे.

- **भ्रष्टाचार :**

''भ्रष्ट असा आचार. भ्रष्टाचार या शब्दाच्या विग्रहातूनच या शब्दाचा अर्थबोध होतो. या शब्दाचा अर्थ अशुध्द , अपवित्र, नियमबाहय वर्तन म्हणजे भ्रष्टाचार होय''. भारतीय राज्यघटनेच्या 161 व्या कलमानुसार ''जो शासकीय - सनदी सेवक आहे किंवा होउ इच्छितो त्याने आपल्या कायदेशीर वेतनाशिवाय दुस-या व्यक्तिकडून आपल्या कर्तव्याबद्दल मान-सन्मानाची अपेक्षा बाळगतो, बक्षिस स्विकारणे, त्या मोबदल्यात संबंधित व्यक्तीशी उपकारक किंवा अपकारक वर्तन करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.

''औपचारिक नियमांना बाजूला सारून खासगी फायदयासाठी नियमबाहय वर्तनातून गैरमार्गाने जो पैसा, मालमत्ता मिळविला जातो या प्रक्रियेला भ्रष्टाचार असे म्हणतात''.

''सत्तेचा , पदाचा स्वतः व कुटुंब, नातेवाईक , मित्र किंवा जवळच्या व्यक्तिंसाठी नियमबाहय, गैरमार्गाने अनुचित फायदा करून घेतला जाणे यालाच भ्रष्टाचार असे म्हणतात''.

- **भ्रष्टाचारास जबाबदार घटक :**

1. प्रचंड लोकसंख्या 2. सामाजिक परिस्थिती 3. आर्थिक असमानता 4. राजकीय परिस्थिती
5.महागाई 6. प्रशासकीय यंत्रणेतील त्रुटी 7. बदलती जीवनशैली
8. वाढत्या गरजा इ. ही न संपणारी यादी.

- **भ्रष्टाचाराचे प्रकार :** भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार सांगता येतील. मात्र ढोबळमानाने भ्रष्टाचाराच्या प्रकारांची विभागणी खालीलप्रमाणे.

1. राजकीय 2. प्रशासकीय
3. आर्थिक 4. सामाजिक इ.

**भ्रष्टाचार ही एक मानसिक प्रवृत्ती :**

भ्रष्टाचार ही एक मानसिक प्रवृत्ती आहे. तर लोभ हा त्याचा पाया आहे. नैसर्गिक सहजप्रवृत्तीं अंतर्गत मॅकडुगल या मानसशास्त्रज्ञाने दिलेल्या 14 सहजप्रवृत्तीमध्ये या प्रवृत्तीचा समावेश होतो. तिचे शमन करण्यासाठी विविध मार्गांचा वापर केला जातो. समाजात आज व्यक्तीपेक्षाही जास्त महत्त्व पैशाला आहे. त्यामुळे या-ना त्या मार्गाने तो मिळविण्याची जणू स्पर्धाच सुरू आहे. जिथे लोभाचा अतिरेक तिथे भ्रष्टाचाराचा जन्म. भ्रष्टाचार समस्या काही फक्त आपल्या देशाचीच समस्या आहे असे नाही. जगातील अनेक देश या समस्येने ग्रस्त असून त्याचा राष्ट्रीय विकासावर वाईट व दूरगामी परिणाम होतो. जागतिक पातळीवर आपल्या देशाचे स्थान यामध्ये अव्वल दिसून येते. भारतात स्थानिक पातळीपासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंत प्रत्येक ठिकाणी मुलभूत व इतर बाबींमध्ये प्रचंड मोठया प्रमाणात आर्थिक, नैतिक व सामाजिक भ्रष्टाचार अनुभवास येतो. याची उदाहरणे बोफोर्स, चारा, मुद्रांक, कॉमनवेल्थ, कोळसा, टू-जी स्पेक्ट्रम ते शालेय पोषण आहार, गणवेश, इ...! ही यादी संपणार नाही इतकी आहे.

- **नैतिक मूल्यांचा -हास :**

भारतीय इतिहासात राजा चंद्रगुप्त मौर्य व आर्य चाणक्य यांच्यातील एक प्रसंग आहे. राजा चंद्रगुप्त मौर्य एकदा गृहमंत्री आर्य चाणक्य यांच्याकडे खासगी कामासाठी आला. आर्य चाणक्य सरकारी कामामध्ये दंग होते. वेळ संध्या समयीची. आर्य चाणक्यांनी ,राजास बसण्यास सांगून जळत असलेला दिवा विझवला. व आपला खाजगी दिवा लावला. राजाने त्यांना विचारले. पहिला दिवा विझवून दुसरा का लावला? आर्य म्हणाले आपण आलात तेव्हा सरकारी काम चालू होते, आता खाजगी काम सुरू झाले. म्हणून मी खाजगी दिवा लावला.

आज मात्र अशी विचारसरणी ,कृती कुठेच पहायला मिळत नाही. मात्र समाज स्थिरता व प्रगती करीता अशा विचारांची व कृतीची गरज आहे. जेव्हा जेव्हा समाजातील नैतिकता संपुष्टात येते तेव्हा तेव्हा समाजाच्या अधःपतनास सुरूवात होते. केवळ मी , माझ, माझ्यापुरतं.... एवढयाच चौकटीत राहून प्रत्येक व्यक्ती स्वार्थापोटी जगू लागतो. आणि हीच परिस्थिती भ्रष्टाचाराची पाळेमुळे बळकट करण्यास कारणीभूत ठरते.

- **आदर्शांची कमतरताः**

आपला भारत देश स्वतंत्र होईपर्यंत समाजासमोर अनेक लोकांचा आदर्श सर्वांसमोर होता. तेच आदर्श डोळयासमोर ठेउन त्याकाळातील युवा पिढी स्वातंत्रसंग्रामात निरपेक्ष भावनेने उतरत होती. प्रसंगी आत्मबलिदानास तयार होत होती. मात्र देशभक्तांनी जी स्वप्ने उराशी बाळगून देशाला स्वातंत्र मिळवून दिले ती स्वप्ने आज पावलोपावली रक्तबंबाळ होताना दिसून येते आहेत. आदर्श असं कुणी उरलचं नाही. आज ज्यांना आदर्श म्हणून निवडून द्यावं त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे दुस-या दिवशी वर्तमानपत्रातून समाजासमोर येतात. म्हणजे देशाला स्वातंत्र मिळवून दिले

ते आपल्याच लोकांमध्ये लपलेल्या ब्रिटीशांनी भ्रष्टाचाराच्या रूपातून लचके तोडणे होय. खरचं आपण माणूस म्हणून जगूच शकत नाही का?

खरे तर या भ्रष्टाचाराची सुरूवातच आज अर्भक जन्मापासूनच होताना दिसून येते. म्हणजेच चार भिंतींच्या आतून - घरातून ते समाजापर्यंत अनुभवास येताना दिसून येते. अषा परिस्थितीत बालकावर कितीही चांगले संस्कार करण्याचा प्रयत्न केला तरी कृत्रीम संस्कार व प्रत्यक्ष सामाजिक - कौटुंबिक अनुभव यातील दरी वाढतच जाते. शालेय परिसरात , कुटुंबात कितीही आदर्शाचे , नैतिकतेचे डोस पाजले तरी ते मुळीच पचणार नाहीत , ते मनाने स्विकारले जाणार नाहीत. व्यवहारात , समाजात जे जे उपयोगी त्याचाच स्विकार केला जाणार , जसा समाज तशी व्यक्ती घडते. यात तिळमात्र शंका नाही. मग हे सर्व तर बदलायला हवे! , कसे ? बदलायला हवे तर तुम्ही आम्ही सर्व प्रौढ पिढीने. कारण नवी पिढी ही जुन्या पिढीचे अनुकरण करतच येत असते. इतकेच नव्हे तर त्यांच्याही पुढे जाण्याचा प्रयत्न करते. आजच्या बाल - किशोरवयान - युवकांपुढील आदर्श म्हणजे तरूण व प्रौढ पिढी होय. ज्यांच्याकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष घरात ,समाजात, शासन यंत्रणेत अनैतिकतेचे स्व-अनुभव ही नवी पिढी घेताना दिसते. निसर्गनियमांप्रमाणे नवीन पिढी ही जुन्या पिढीपेक्षा अधिक उक्रांत , विकसित असते. त्यांच्याकडूनच भ्रष्टाचार कसा करावा याची बाळकडू ते घेत असतात.

उदाहरणार्थ : दिवाळीच्या कपडे खरेदीसाठी रमाकांत व बाबा दुचाकीवरून दुकानाकडे निघाले होते. एका चौकात वाहतूक नियंत्रकाने त्यांना थांबविले. गाडी चालविण्याचा परवाना , प्रदुषण मुक्त वाहन चाचणी प्रमाणपत्र, वाहन विमा इत्यादी कागदपत्रे मागितली परंतू रमाकांतच्या बाबांकडे वाहन परवान्याखेरीज काहीच नव्हते. वाहतूक नियंत्रकाने दोनशे रूपये दंड भरण्यास सांगितला. रमाकांतच्या समोर बाबांनी दंड न भरता श् ां भररूपये पोलिसाच्या हातात दिले व पोलिसाने त्यांना सोडले. या व अशा घटनांमधून रमाकांतला भ्रष्टाचार कसा केला जातो याचे प्रशिक्षणच मिळते.

या व अशा अनेक घटना आपल्या दैनंदिन जीवनात घडत आहेत. शासनदरबारी जर एखादे काम असेल तर विचार करणे सुध्दा असहय होते. वर्तमानपत्रे , दूरदर्शन वाहिन्यांवरील बातम्यांद्वारे रोज या - ना त्या ठिकाणी होणा-या भ्रष्टाचाराच्या बातम्या आपण पाहतो. भ्रष्टाचार हाच आज शिष्टाचार बनलेला आपणास दिसून येतो. काही मिळाल्याशिवाय काही द्यायचेच नाही अशी संस्कृती आज अस्तित्वात आलेली आपणास दिसून येते आहे.

- **राष्टीय विकासातील प्रमुख अडथळा :**

भ्रष्टाचार ही समस्या फक्त आपल्या देशातच आहे अशी नाही तर , मोठमोठया देशांची ही एक उग्र समस्या आहे. यामुळे या देशांच्या विकासाला खीळ बसत आहे. हाच भ्रष्टाचार कर्करोगासारखा संपूर्ण मानवजातीस व्यापून राहिला आहे. देशाच्या सामाजिक , आर्थिक, नैतिक स्वास्थ्याला खरा धोका बाहय शत्रूंपासून नसून तो अंतस्थ , भ्रष्ट लोकांपासून जास्त आहे. हा भ्रष्टाचाराचा कर्करोग एवढा वाढला आहे की त्याचा सामना कोणी एक नव्हे तर त्यासाठी सर्वांनीच प्रामाणिकपणे प्रयत्न करणे गरजेचे बनले आहे. नाहीतर हाच भ्रष्टाचार सामाजिक न्याय , समता, बंधुता, व एकात्मता बनण्यामध्ये प्रमुख अडथळा बनेल.

- **निर्मोहीत्वाची गरज :**

आज सर्वात मोठा भ्रष्टाचार समाजाला सतावत आहे तो प्रशासकीय यंत्रणेत. प्रशासकीय यंत्रणा म्हणजे तर कुबेराची खाणच जणू. आधुनिक जीवनषैलीत वाढत्या गरजांमुळे व्यक्ती जास्तीत-जास्त पैसा मिळविण्यात गुंतलेला आहे. कमी आहे तो वेळ. अशा वेळी लवकरात लवकर आपले काम व्हावे असे प्रत्येकालाच वाटते. प्रशासकीय कामकाज पध्दती लांबलचक व संथ. प्रशासकीय काम लवकरात लवकर व्हावे यासाठी आपण काहीतरी देणे आवश्यकच आहे अशी व्यक्तिची झालेली मानसिकता , तर याउलट समोरच्याने आपणाला त्याचे काम करून घेण्यासाठी काहीतरी देणे लागतो ,

आणि नाही दिले तरी त्याच्याकडून घेणे हा जणू आपला हक्कच. अशा अविर्भावात प्रशासन प्रक्रिया चालू असलेली आपणा सर्वांना अनुभवास येते आहे.

- **भ्रष्टाचारमुक्त कल्याणकारी प्रशासन यंत्रणेसाठी काही आवश्यक तत्त्वे - सुप्रशासन :**

भ्रष्टाचार संपविण्याची सरकारची इच्छा असेल , तर ते करताही येईल. त्यासाठी आपणास अन्य देशांकडे पाहता येईल. सिंगापूरचे उदाहरण बोलके आहे. 1970 पर्यंत भ्रष्टाचार आणि आर्थिक अराजकतेत रूतलेल्या सिंगापूरमध्ये आज भ्रष्टाचार पूर्णतः कमी झालेला दिसून येतो. भ्रष्टाचारविरोधी कारवाई विभाग हे सिंगापरच्या यशाचे गमक आहे. भ्रष्टाचाराबाबतचे आतंरराष्टीय तज्ञ जॉन हेलिब्रन यांनी दिलेल्या माहितीनुसार , या विभागाला सरकारी नोकरांच्या कार्यालयांवर छापे घलण्याचे , त्यांना एक लाख सिंगापूरी डॉलर पर्यंतचा दंड करण्याचे आणि पाच वर्षे तुरूंगवास ठोठावण्याचे अधिकार आहेत. हा विभाग उच्चस्तरीय समितीला अहवाल देतो. आणि ही समिती थेट अध्यक्षांशी संपर्क साधते.

कठोर शिक्षेमुळे सिंगापुरात सरकारी पातळीवरील भ्रष्टाचाराचे प्रमाण वर्षानुवर्षे घटत चालले आहे. या मुद्यावर सिंगापूरची स्कॅनेडेव्हियन देशांशी स्पर्धा आहे. स्कॅनेडेव्हियन देशांत भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी आहे. पूर्णपणे वेगळया राजकीय व्यवस्थेमुळे भारताला सिगापूरचे तंतोतंत अनुकरण करता येणार नाही , पण सिंगापूरच्या धर्तीवर काही उपाययोजना करता येतील.

यासाठी केवळ प्रशासन उपयोगाचे नाही तर ते सुप्रशासन हवे. जनतेचा वेळ,श्रम,पैसा न घेता स्वच्छ व पारदर्शक , सुत्रबध्द व्यवस्थेस सुप्रशासन असे म्हणता येईल.

### 1. पारदर्शकता :

पारदर्शकता म्हणजे स्वच्छ कारभार होय. लपवालपवी , संदिग्दधता, अशा कृतीला यात वाव नसतो. निसंदिग्धता , नैतिकता , पवित्र आचरण व सुटसुटीत कार्यप्रणाली अस्तित्वात आणणे म्हणजे पारदर्शकता होय.

### 2. उत्तरदायित्व :

ज्या पदावर काम करत असतो त्या पदाच्या काही जबाबदा-या असतात. कोणालातरी त्याबाबत आपण जाब/उत्तर देणे लागतो. दिलेले काम अचूकपणे यशस्वी करण्यास आपण जबाबदार आहोत. ही भावना म्हणजे उत्तरदायित्व होय.

### 3. विश्वासार्हता :

विश्वासार्हता ही सुप्रशासनाचा आत्मा होय. लोकमनातील साशंकता, भिती दूर करून आदराने व विश्वासाने पाहण्यास / पात्र होण्यास आवश्यक परिस्थिती निर्माण करणे होय.

### 4. जबाबदारी :

उत्तरदायित्व व जबाबदारी या एकाच नाण्याच्या दोन बाजू होय. अधिकार कक्षेतील कामे सुव्यवस्थित चालवताना निर्धारीत कामकाज पूर्ण करण्यासाठी नियमबाहय घटकांचा वापर न करता , पदाचा , अधिकाराचा गैरवापर न करता इमाने इतबारे कर्तव्यपालन करणे.

### 5. बांधिलकी :

लोकसेवक म्हणून ज्या समाजाच्या सेवेसाठी माझी नेमणूक केलेली आहे त्या कर्तवय व जबाबदारीषी मी प्रामाणिक राहून कार्य करणे.

### 6. निस्वार्थीपणाः

सार्वजनिक पदावर लोकसेवक म्हणून काम करताना कोणताही वैयक्तिक स्वार्थ ठेवून स्वतः, कुटूंब ,मित्र , नातेवाईकांसाठी निर्णय न घेणे.

### 7. सचोटी :

कर्तव्याशी फारकत होईल अशा व्यक्ती , संस्था यांच्या आर्थिक व अन्य उपकारांच्या ओझ्याचा भार न घेणे.

### 8. वस्तूनिष्ठता :

कोणताही स्वार्थ हेतू किंवा पूर्वग्रहदू षित मत न ठेवता लोकसेवकांनी केवळ आणि केवळ गुणवत्तेवर भर द्यावा.

### 9. नेतृत्त्व :

उच्चपदस्थ अधिका-यांनी निष्ठा, नैतिकतेने कर्तव्य बाजवून अखत्यारित कर्मचा-यासमोर उत्कृष्ट नेतृत्त्वाचे उदाहरण ठेवावे व पाठींबा दयावा. यासाठी प्रत्येक व्यक्तिने / लोकसेवकाने वरील तत्त्वांचे पालन केल्यास भ्रष्टाचर मुक्त समाजाचे स्वप्न साकार होईल व ख-या अर्थान समाज -राष्ट्राचा समातोल - सर्वांगीण विकासास वेग येईल. याची सुरूवात आज आत्तापासूनच करावी लागेल. अषा परिस्थितीत कुठेतरी श्रध्दा ठेवून समाज घडविणा-या क्षेत्रांकडे आशेने पहावेच लागेल. ते म्हणजे शिक्षण. अं.... अं... अं... थांबा ! मी औपचारिक शिक्षण असे म्हणत नाही. मी पालक , कुटुंब, समाज, अनौपचारिक आणि औपचारिक शालेय शिक्षण असं म्हणतो. कारण प्राथमिक ते उच्च भारतीय शिक्षणप्रक्रियेतील भ्रष्टाचाराची प्रकरणे आपण रोज ऐकतो, वाचतो आहोत. याचा अर्थ असा नाही की संपूर्ण परिस्थितीच हाताबाहेर गेली आहे. आजही प्रामाणिकपणे काम करणारे अनेक हात पुढे येताना , प्रत्यक्ष काम करताना आपणास दिसतात.

औपचारिक शिक्षणात शालेय वयातच भ्रष्टाचार विरोधी जाणिवांचा विकास करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. यामध्ये शिक्षकांची भूमिका महत्त्वाची ठरते. शिक्षकाने हा पेशा स्विकारल्यापासून तो त्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत तो विद्यार्थ्यांचा आदर्श असतो. कारण तो आपल्या संपूर्ण जीवन-वर्तनातून फक्त विद्यार्थी नव्हे तर त्यांची मने घडवित असतो. यासाठी स्वतः शिक्षकाचे वर्तन, आचार-विचार आदर्श असले पाहिजेत. म्हणूनच म्हटले जाते की, ''कोणतही मूल हे पाठयपुस्तकातून नव्हे तर, शिक्षकाच्या चालण्या,बोलण्या,वागण्यातून शिकत असतं.'' त्यासाठी शिक्षकांनी अध्ययन-अध्यापनाबरोबरच , अभ्यापूरक व अभ्यासेतर उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कळत-नकळत भ्रष्टाचार विरोधी जाणिवांचा विकास करणे गरजेचे आहे. यापुढे जाउन भ्रष्टाचार म्हणजे काय? , तो कसा होतो, त्याचे परिणाम कोणते याची जाणिव करून द्यावी. त्यासाठी दैनंदिन जीवनातील विविध उदाहरणे दिली जावीत.

### संदर्भसूची :


- माहेश्वरी, श्रीराम, (2002), भारतीय प्रशासन, , ओरिएंटल लॉंगमन, मुंबई
- श्रीवास्तव, सी. पी. (2005), भ्रष्टाचार : भारताचा अंतस्थ शत्रू , पुणे, रोहन प्रकाषन.
- कुमारभारती मराठी, इयत्ता नववी, व्यक्तिमत्त्व विकास,(मे 2008), महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.